UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

## पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ५

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक** :

● प्रा.डॉ.पी.जी.गायकवाड ● प्रा.डॉ.गोवर्धन दिकोंडा ● प्रा.डॉ.सुरेश रामचंद्र ढेरे

**※ प्रकाशक ※**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.

या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with CamScanner

१९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानव मुक्तीचे लढे – डॉ.विजय रेवजे, सोलापूर ------------- ८३
२० डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवादी दृष्टीकोण
– डॉ.वासुदेव डोंगरदिवे, मोखाडा, जि. पालघर ------------------------------- ८५
२१ महात्मा फुले यांचे पददलितांच्या शिक्षणासंबंधीचे योगदान – प्रा.आनंद शिंदे, सोलापूर -------- ९०
२२ महात्मा जोतीराव फुले – एक दृष्टा और स्रष्टा युगपुरुष – डॉ.दत्तात्रय अनारसे, माढा, जि.सोलापूर – ९३
२३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बहिष्कृत हितकारिणी सभा
– डॉ.दिगंबर वाघमारे, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर ------------------------- ९६
२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सशक्तिकरण
– डॉ.दिलीप बिराजदार, माकणी, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद------------------- १०१
२५ महात्मा जोतीराव फुले यांच्या कुळंबीण' अखंडातील जातीव्यवस्था व स्त्री शोषणाचा विचार
– डॉ.दिनकर मुरकुटे, एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे ------------------ १०५
२६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक व कृषिविषयक विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास
– डॉ.स्मिता पाकधाने, नाशिक ------------------------------------ १०९
२७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बौद्ध धम्म प्रभाव आणि वारसा, सामजिक अस्तित्वाचा पर्यायी समृद्ध मार्ग
– डॉ.प्रभाकर कोळेकर, सोलापूर------------------------------------ ११६
२८ आंबेडकरवादी इतिहास पद्धतीचे वैचारिक तत्त्वज्ञान व त्याची मिमांसा
– डॉ.प्रविण बोरकर, उल्हासनगर, मुंबई-------------------------------- १२३
२९ आधुनिक भारताच्या सामाजिक चळवळीचा दीपस्तंभ महात्मा फुले कृत सत्यशोधक समाज
– डॉ.राजेंद्र गायकवाड, टेंभुर्णी, जि.सोलापूर. --------------------------- १२९
३० महात्मा जोतिराव फुले यांचे सत्यशोधक समाजाबाबतचे विचार
– डॉ. सुशिल शिंदे, पंढरपूर, जि.सोलापूर ----------------------------- १३१
३१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित चळवळीतील योगदान
– डॉ.संजीव बोडखे, खटाव, जि.सातारा ------------------------------ १३६
३२ महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाज सुधारणाविषयक विचार
– प्रा.दत्तू शेंडे, कर्जत, जि.अहमदनगर. ---------------------------------- १३९
३३ आधुनिक भारताच्या संविधान निर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
– डॉ.सुभाष वाघमारे, सातारा. ----------------------------------------- १४१
३४ डॉ. बाबासाहब अंबेडकर के वैचारिक परिप्रेक्ष्य में हिंदी दलित आत्मकथा साहित्य
– डॉ.प्रमोद परदेशी, कर्जत, जि.अहमदनगर. ------------------------------ १४५
३५ समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा फुले यांचे विचार व कार्य : एक अभ्यास
– डॉ.गौतम ढाले, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर. ---------------------------- १४९
३६ महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांच्या प्रगतीबाबत विचार – डॉ.घनश्याम महाडीक, अमरावती ---- १५४
३७ महात्मा फुले यांचे भारतीय शेती व शेतकऱ्याविषयीचे विचार
– १) डॉ.उद्धव घोडके, पुणे; २) डॉ.पांडुरंग लोहोटे, पुणे. ------------------- १५६
३८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय समाजाच्या शिक्षणाचा हक्क
– डॉ.संतोष जाधव, मोखाडा, जि.पालघर. -------------------------------- १५९



Scanned with CamScanner

ISSN No. 2394-5990

# महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाज सुधारणाविषयक विचार

प्रा. डॉ. शेंडे दत्तु दादासाहेब
राज्यशास्त्र विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि.अहमदनगर
मो.नंबर : ८४४६१०९५५७ ई–मेल : shendedd@gmail.com

**प्रस्तावना :**

महात्मा फुले हे क्रांतिकारक समाजसुधारक अव्वल दर्जाचे समाजसुधारक विचारवंत व प्रबोधक साहित्यिक होते. त्यांनी सर्व आयुष्य बहुजनांच्या उद्धारासाठी समर्पित केले. सामाजिक विषमते विरुद्ध बंड पुकारले, स्रीयांच्या व अस्पृशांच्या उद्धारासाठी ते अहोरात्र झटले. समाजसुधारकांचे कार्य करत असतांना आपल्या ध्येयापासून ते कधी ही विचलित झाले नाहीत. अशा या महात्म्याला कृतीशील, क्रांतिकारक, कर्ता समाजसुधारक, समाजसुधारकांचे अग्रणी, स्त्रीयांचा उद्धारकर्ता, दलितांचा कैवारी अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते.

महात्मा ज्योतीराव फुले म्हणजेच समस्त बहुजन भारतीयांना शिक्षित करणारे विज्ञाननिष्ठ विद्यापीठ होय. देशाच्या आणि मानवाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, याची जाणीव महात्मा फुले यांना होती. विदेशी आर्य ब्राम्हणांच्या धर्म ग्रंथांनी स्वतःच्या वर्चस्वासाठी वर्ण व्यवस्थेवर आधारित विषमतावादी समाजरचना निर्माण करून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे विभाजन केले व येथील बहुजनांना शुद्र व अति शूद्र बनवून गुलाम केले. शुद्र, अतिशूद्र गुलाम म्हणून रहावे व ब्राम्हण, क्षेत्रीय व वैश्य या तीन वर्गातील लोकांची त्यांनी सेवा चाकरी करावी असे हिंदू धर्मग्रंथ सांगतात म्हणून शूद्रांना वर्ण व्यवस्थेने सर्व अधिकारांपासून वंचित ठेवले होते. त्यांना पशूपेक्षाही अत्यंत हीन दर्जाचे वागणूक दिली जायची यासर्व गोष्टींचे मूळ म्हणजे अज्ञान होय. हे ज्योतीरावांनी जाणले होते. परन्तु वर्ण व्यवस्थेनुसार बहुजनांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांना शिक्षणाची बंदी होती. या नरकयातनातून बहुजनांची मुक्ती करण्यासाठी बहुजनांना शिक्षित करण्याचे मौलिक कार्य ज्योतीरावांनी केले.

**समतेविषयक विचार :-**

१९ व्या शतकातील जगभरातील विचारवंताप्रमाणेच ज्योतीरावांनाही समतेच्या तत्वाने प्रेरित केले. त्यांनी समतेच्या तत्वाचा अत्यंत सखोल, समग्र आणि साक्षेपी विचार ह्या काळात मांडला. येथील विषम समाजव्यवस्थेची उत्पत्ती सांगून ती कशी तर्कदृष्ट्या आहे हे त्यांनी स्पष्ट केले. माणसाचे माणूस म्हणून हक्क त्याला कधीच कोणी नाकारू शकत नाही, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. जातीभेद, अस्पृश्यता, स्री–दास्य यांचा त्यांनी कडाडून विरोध केला. शिक्षण, प्रबोधन, कायदे, व्यवसाय स्वातंत्र्य इ. मार्गांनी पारंपारिक विषमता नष्ट करून नवसमताधीष्टीत समाज कसा निर्माण करता येईल याचा त्यांनी बारकाईने विचार केला. ब्राम्हणी व वर्णश्रेष्ठत्वाचा पुरस्कार करणाऱ्या विचारप्रणालीला समतावादी शुद्र विचारप्रणालीचा पर्याय देण्याचा पहिला प्रयत्न म. फुले यांनी केला. त्यामुळेच ते त्यांच्या काळातील सर्वश्रेठ अग्रणी ठरतात.

म.फुले हे संपूर्ण आयुष्यभर सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्य करत राहिले. प्रत्येक एक सुधारणा जी समाजामध्ये समता, स्वातंत्र्य, विकास घडवून आणेन त्याला ते महत्त्व देत होते. समाजामध्ये समानता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी वेगवेगळे प्रयोग केलेले दिसून येतात. जसे स्री शिक्षण, दलित शिक्षण, सत्यशोधक समाजाची निर्मिती, अस्पृश्यता पाळण्यास बंदी विधवा पुनर्विवाहावर भर, बाल विवाहास मनाई, सती प्रथेस विरोध, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना एवढेच नव्हे तर विविध धर्मग्रंथांचा अभ्यास करून त्यातील साधर्म्यांवर चर्चा इ. सर्व घटक वापरून त्यांनी समाजामध्ये समानता आणण्याचा प्रयत्न केला. म.फुले यांना समानता म्हणजे जाती, धर्म, वंश, लिंग यासर्व घटकांमध्ये समानता निर्माण करणारे तत्त्व हवे होते.

समाजामध्ये समानता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी अनेक तत्त्वांचा आधार घेतला. जसे :

**१. निर्मिक :** सर्व मानव प्राणी एकाच ईश्वराची लेकरे असल्याने त्यांचे सर्व हक्कही समान असले पाहिजे आणि त्यांनी एकमेकात बंधुभाव आचरावा, अशी त्यांनी सत्यशोधक समाजाद्वारे शिकवणूक जनतेला दिली. निसर्गातल्या सर्व गोष्टी निर्मिकाने सर्वांकरवी मुक्त वापर व्हावा यासाठी निर्माण केल्या आहेत सर्व माणसांना सारखीच पंचेन्द्रीय व विचारशक्ती दिली आहे हे स्मरून माणसांनी परस्परांशी समतेचा व्यवहार करावा असे आवाहन त्यांनी केले. निर्मिकाने दिलेले मानवी अधिकार सर्वांना भोगात न येणे हे त्यांना आपल्या समाजरचनेचे सर्वात आक्षेपार्ह वैगुण्य



Scanned with CamScanner

वाटत होते .

**२. स्त्री–पुरुष समानता :** स्त्री पुरुष समतेचा सातत्याने पुरस्कार करणारे आणि त्यासाठी अत्यंत मूलगामी युक्तिवाद करणारे ज्योतीराव हे भारतातील स्त्री मुक्ती विचाराचे आद्यप्रवर्तक ठरतात. स्त्री शिक्षण, स्त्रीविषयक अन्याय, रुढींचे निर्मुलन, स्त्रीयांच्या व्यावहारिक अडचणींचे निवारण याक्षेत्रात त्यांनी ठोस कार्य केले आहे त्याचप्रमाणे स्त्री दास्यत्वाच्या कारणांच्या खोलात जाऊन त्यांनी शोधही घेतला होता.

**३. केशवपन व सती प्रथेस विरोध :** केशवपन ही अनिष्ठ प्रथा बंद व्हावी म्हणून म. फुले यांनी न्हाव्यांच्या सभा घेऊन त्यांना आवाहन केले कि असले अमानुष नीच काम तुम्ही करू नका त्या आपल्या मातेसमान समजून त्यांच्याशी वागा.

एखाद्या स्त्रीचा नवरा ज्यावेळी मृत होतो त्यावेळी तिला अनेक संकटे सोसावी लागतात, तिला आयुष्यभर वैधव्यात रहावे लागते. पूर्वी स्त्रीया सती जात असत परंतु पुरुषाला असे बंधन/ प्रथा सांगण्यात आली नव्हती त्यावरही म. फुले यांनी कोरडे ओढले आहेत.

**४. अस्पृश्य उद्धाराचे कार्य :** म. फुले यांच्या काळात शुद्रातीशुद्रांना अति हिनतेने वागविले जात होते. त्यांना दारिद्र्यामुळे शिक्षण घेता येत नव्हते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा सर्वच अंगांनी त्यांचा छळ चाललेला होता, हे म.फुले यांनी जाणले होते. अस्पृश्यांची दुखेः त्यांची दारिद्र्ये नष्ट करण्यासाठी इ.स. १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. पिढ्यान् पिढ्यानपासून अज्ञान अंधारात खितपत पडलेल्या अस्पृश्यांना म.फुले यांनी ज्ञानाचे दरवाजे उघडून दिले. त्यांच्यात स्वाभिमान निर्माण केला.

**५. सत्य शोधक समाज :** म.फुले यांनी १८७६ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सामाजिक पुनरघटनेसाठी चळवळ सुरु करणाऱ्या आरंभीच्या संस्थांपैकी एक संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय.

या सत्यशोधक समाजाची तीन तत्त्वे होती.

१. ईश्वर एकच असून तो सर्वव्यापी निराकार निर्गुण व सत्यरूप आहे, सर्व मनुष्य प्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

२. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

३. मनुष्य जातीने नाही तर गुणाने श्रेष्ठ ठरतो.

**६. इतर धर्मांचा अभ्यास :** इस्लाम व ख्रिस्ती धर्म यातील समानतावादी दृष्टिकोनाबद्दल म. फुले यांनी गौरवोद्गार काढले आहेत. हिंदूंच्या प्रचलित विषमतामुलक धर्माचरणाच्या जागी समदृष्टी धर्माचरणाची प्रतिष्ठापना व्हावी, असे त्यांना मनापासून वाटत होते. सत्यधर्माची त्यांची संकल्पना त्यातूनच उभी राहिली आहे.

**सारांश :**

म. फुले हे समाजसुधारक, स्त्रियांचे उद्धारकर्ते, दलितांचे कैवारी होते. म. फुले हे समस्त बहुजन समाजाला शिक्षित करणारे विज्ञाननिष्ठ विद्यापीठ होय. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचे ते उगमस्थान होते. प्रगतीशील शेतकरी व उद्योजक म्हणून ते आजच्या पिढीचे ते आदर्श आहेत.

**संदर्भ :**

१. डॉ. च. वि. जोशी, सत्यशोधक समाज साहित्य आणि विचार ऋतु प्रकाशन – अहमदनगर – प्रथमावृत्ती २४ जुलै २०१०.

२. डॉ. भास्कर लक्ष्मण भोले, भारतीय राजकीय विचारवंत, अशोक पिंपळापुरे – नागपूर – सुधारित आवृत्ती – २०११.

३. विद्युत भागवत, राजेंद्र कुमार पांडे, अनुवाद – चित्र लेले, आधुनिक भारतीय राजकीय विचार संहिता आणि संदर्भ. डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम मराठी आवृत्ती – २०१३.

४. डॉ. शंकर चव्हाण, आधुनिक राजकीय विचारप्रणाली, प्रशांत पब्लिकेशन– जळगाव, प्रथम आवृत्ती ५ जुलै २०१५.

● ● ●



Scanned with CamScanner